Sanjivani Shikshan Sanstha, Asgaon

# ASHOK MOHARKAR ARTS & COMMERCE COLLEGE,

## ADYAL, DISTRICT - BHANDARA, MAHARASHTRA

Organizes

One Day National Multidisciplinary Online Conference

On

# INDIAN WOMEN: PAST, PRESENT AND FUTURE

Date : 23rd January 2026

## CERTIFICATE

This is to certify that Mr./Mrs./Miss./Dr. डॉ. शाहीद मुस्ताक मुल्ला, राज्यशास्त्र विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड has participated/presented a paper titled "सत्ता विकेंद्रीकरण ते महिला सक्षमीकरण : पंचायत राजमधील महिला सहभागाचा प्रवास आणि आव्हाने" in the One Day National Multidisciplinary Online Conference on 23rd January 2026.

His/her paper has been published in **Peer Reviewed Refereed & UGC Listed Journal No. - 40776 - AJANTA - ISSN - 2277-5730 with Impact Factor - 8.172**.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Conference Secretary | Conference Co-Convener | Conference Co-Convener | Conference Convener | Conference President |
| Prof. Dipak Jamnik | Dr. Raju Dhabale | Prof. Rajesh Chauhan | Dr. Vidya Thaokar | Dr. Shrikrushna Raut |
| Ashok Moharkar College, Adyal. | Ashok Moharkar College, Adyal. | Ashok Moharkar College, Adyal. | Ashok Moharkar College, Adyal. | Principal, Ashok Moharkar College, Adyal. |

M - I - 18

ISSN - 2277-5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Single Blind Review / Double Blind Review
Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal No. 40776
Volume - XV | Issue - I | January - March - 2026
Impact Factor 2025 - 8.172 (www.sjifactor.com)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

*Is hereby awarding this certificate to*

डॉ. शाहीद मुस्ताक मुल्ला

*In recognition of the publication of the paper titled*

सत्ता विकेंद्रीकरण ते महिला सक्षमीकरण : पंचायत राजमधील महिला सहभागाचा प्रवास आणि आव्हाने

Ajanta Prakashan
ISO 9001:2015 QMS / ISBN / ISSN
Jaisingpura, Near University Gate, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad),
Maharashtra - 431 004, Mob. No. 9579260877, 9822620877
ajanta2026@gmail.com | www.ajantaprakashan.in

M - I - 18

Editor
Dr. Vinay S. Hatole

ISSN - 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XV | Issue - I | January - March - 2026

MARATHI PART - I

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 40776**

**Single Blind Review / Double Blind Review**

**Impact Factor / Indexing
2025 - 8.172**
www.sjifactor.com

**EDITOR**

Dr. Vinay Shankarrao Hatole
Assistant Professor, International Center of Excellence in Engineering
& Management (ICEEM) College, Waluj, Chhatrapati Sambhajinagar. (MS)

**PUBLISHED BY**

AJANTA PRAKASHAN
Jaisingpura, Chhatrapati Sambhajinagar. (MS)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अनु.क्र. | लेख आणि लेखकचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | ग्रंथालय सेवांमध्ये महिलांचा सहभाग : क्षमता, योगदान आणि प्रभाव<br>**प्रा. प्रमोद तुकाराम अढाव** | ८१-८४ |
| १५ | २१व्या शतकातील कुमारी माता आणि त्यांच्या समोरील आव्हाने : एक चिकित्सक अध्ययन<br>**वृषाली जगताप**<br>**डॉ. सुनिता बाळापुरे** | ८५-९० |
| १६ | नोकरी करणाऱ्या महिलांना भेडसावणाऱ्या प्रमुख मानसशास्त्रीय समस्यांचा अभ्यास<br>**डॉ. रामेश्वर बाबासाहेब राऊत** | ९१-९५ |
| १७ | संत मीराबाई यांचे जीवन कार्य व त्यांचे संगीतातील योगदान<br>**प्रा. दिपक महादेव जामनिक** | ९६-९९ |
| १८ | सत्ता विकेंद्रीकरण ते महिला सक्षमीकरण : पंचायत राजमधील महिला सहभागाचा प्रवास आणि आव्हाने<br>**डॉ. शाहीद मुस्ताक मुल्ला** | १००-१०४ |
| १९ | रजोनिवृत्ती काळातील स्त्रीयांच्या शारीरिक स्वास्थ्यातील बदलांचा चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ चंद्रपूर जिल्हा<br>**कु. अर्चना आनंदराव खंडाळे**<br>**डॉ. उषा एम. खंडाळे** | १०५-११० |
| २० | प्रौढ स्त्रियांच्या सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तनात दूरदर्शनचा प्रभाव : काल, आज आणि उद्या<br>(संदर्भ : ग्रामीण चंद्रपूर जिल्ह्याच्या संदर्भात)<br>**कु. सविता पी. लुलू** | १११-११७ |
| २१ | डिजीटल साक्षरता आणि महिला सक्षमीकरण<br>**डॉ. भारती एस. लच्छोरे** | ११८-१२१ |
| २२ | तंजावर चित्रकला आणि संगीत परंपरेच्या विकासात मराठा स्त्रियांचे योगदान : एक ऐतिहासिक अध्ययन<br>**अमितकुमार गणेश शिंगणे** | १२२-१२७ |
| २३ | मराठी साहित्यात स्त्रियांचे योगदान<br>**प्रा. विलास मेश्राम** | १२८-१३१ |
| २४ | साहित्य आणि भारतीय महिला<br>**डॉ. स्मिता गजभिये** | १३२-१३६ |
| २५ | पंचायतराज मध्ये महिलांची भूमिका व योगदान<br>**प्रा. अनिल गावंडे** | १३६-१४२ |
| २६ | महिला सशक्तीकरण : एक दृष्टीक्षेप<br>**डॉ. वंदना बनकर** | १४३-१४९ |

# १८. सत्ता विकेंद्रीकरण ते महिला सक्षमीकरण : पंचायत राजमधील महिला सहभागाचा प्रवास आणि आव्हाने

**डॉ. शाहीद मुस्ताक मुल्ला**
राज्यशास्त्र विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.

**सारांश**

लोकशाहीच्या यशस्वितेसाठी सत्तेचे तळागाळापर्यंत विकेंद्रीकरण होणे अनिवार्य असते. भारतासारख्या विशाल देशात ग्रामीण विकासाचा कणा 'पंचायत राज' व्यवस्था आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंनी पंचायत राजला "लोकशाहीची पहिली शाळा" म्हटले आहे, तर महात्मा गांधींनी "खेड्यांकडे चला" असा संदेश देऊन ग्रामस्वराज्याची कल्पना मांडली. कोणत्याही राष्ट्राच्या उभारणीत महिलांची भूमिका निर्णायक असते. "जर तुम्हाला समाजात जागृती निर्माण करायची असेल, तर आधी महिलांना जागृत करा; कारण जेव्हा महिला पुढे जाते, तेव्हा कुटुंब, गाव आणि पर्यायाने देश पुढे जातो," असे नेहरूंनी म्हटले होते. याच विचारातून ७३ व्या घटनादुरुस्तीद्वारे महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण देऊन त्यांना निर्णय प्रक्रियेत सक्रिय वाटा देण्यात आला आहे.भारतीय लोकशाहीच्या इतिहासात ७३ वी घटनादुरुस्ती हा महिला सक्षमीकरणाचा टर्निंग पॉईंट ठरला आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण करून ग्रामीण भागातील सामान्य महिलांना निर्णय प्रक्रियेत स्थान देणे हा या व्यवस्थेचा मुख्य हेतू आहे. प्रस्तुत शोधनिबंधात पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून महिलांच्या सामाजिक आणि राजकीय स्थितीत झालेला बदल, त्यांच्या आत्मविश्वास वाढीचे प्रमाण आणि त्यांच्या मार्गातील अडथळे यांचा चिकित्सक आढावा घेण्यात आला आहे.

**कळीचे शब्द :** सत्ता विकेंद्रीकरण, ७३ वी घटनादुरुस्ती, पंचायत राज, महिला सक्षमीकरण, राजकीय सहभाग, ग्रामीण विकास

**प्रस्तावना**

"लोकशाहीची पहिली शाळा" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंचायत राज व्यवस्थेचा पाया महात्मा गांधींच्या 'ग्रामस्वराज्य' संकल्पनेवर आधारित आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या मते, "जर समाजात जागृती निर्माण करायची असेल, तर आधी महिलांना जागृत करा. त्या पुढे गेल्या की कुटुंब, गाव आणि पर्यायाने देश पुढे जाईल." सत्तेचे विकेंद्रीकरण म्हणजे केवळ अधिकारांचे वाटप नव्हे, तर समाजातील शेवटच्या घटकापर्यंत लोकशाही पोहोचवणे होय. ७३ व्या घटनादुरुस्तीने महिलांना ३३% ते ५०% आरक्षण देऊन ग्रामीण राजकारणाचे स्वरूप बदलले आहे.भारतीय संविधानातील कलम ४० नुसार आदर्श ग्रामस्वराज्याचे तत्व स्वीकारण्यात आले आहे.महात्मा गांधींच्या मते खेड्यांचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास शक्य नाही. भारत हा खेड्यांचा देश आहे आणि खेड्यांच्या विकासासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक होते. स्वातंत्र्यानंतर बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था आली, परंतु त्यात महिलांचा सहभाग नाममात्र होता.१९९२ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीने स्थानिक

स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण देऊन क्रांती घडवली. यामुळे लाखो महिला राजकारणात सक्रिय झाल्या. हा केवळ राजकीय बदल नव्हता, तर ते एक सामाजिक स्थित्यंतर होते. सत्तेच्या विकेंद्रीकरणाने महिलांना गावाचा आराखडा तयार करणे, अर्थसंकल्प ठरवणे आणि सामाजिक प्रश्नांवर आवाज उठवण्याची संधी दिली. याच उद्दिष्टाने भारतात लोकशाही विकेंद्रीकरणाचा मार्ग स्वीकारण्यात आला. कोणत्याही राष्ट्राच्या उभारणीत महिलांची भूमिका महत्त्वाची असते; त्यामुळे महिलांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकासात सक्रिय भूमिका बजावण्यासाठी ७३ व्या घटनादुरुस्तीद्वारे संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. सत्ता विकेंद्रीकरण संकल्पना आणि त्याचे महत्त्व स्पष्ट करणे.

२. पंचायत राजमधील महिलांच्या राजकीय प्रवासाचा ऐतिहासिक आढावा घेणे.

३. महिला सहभागाचा सक्षमीकरणावर होणारा परिणाम तपासणे.

४. महिला लोकप्रतिनिधींना भेडसावणारी आव्हाने आणि त्यावरील उपाय शोधणे.

**विषय विवेचन**

सत्ता विकेंद्रीकरण म्हणजे सत्तेचे वरच्या स्तराकडून (केंद्र व राज्य) खालच्या स्तराकडे (ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद) हस्तांतरण होय. लोकशाहीमध्ये सामान्य माणसाचा सहभाग वाढवण्यासाठी ही प्रक्रिया अनिवार्य असते. सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे निर्णयाचे केंद्र दिल्ली किंवा मुंबई न राहता 'गाव' बनले आहे. यात महिलांचा सहभाग वाढल्यामुळे आरोग्य, शिक्षण आणि पाणी यांसारख्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य मिळाले आहे.

**पंचायत राजमधील महिला सहभागाचा इतिहास**

प्राचीन काळी 'ग्राम' हे प्रशासनाचे सर्वात लहान एकक होते, परंतु महिलांच्या सक्रिय सहभागाचे ठोस पुरावे आढळत नाहीत.स्वातंत्र्यपूर्वकाळा मध्ये स्थानिक संस्थांमध्ये महिलांचा सहभाग अत्यंत नगण्य होता. केवळ उच्चभ्रू वर्गातील महिलांना काही प्रमाणात स्थान होते. मध्ययुगीन आणि ब्रिटिश काळात पंचायत संस्थांचे महत्त्व कमी झाले. मुघल आणि राजपूत काळात सरंजामशाहीमुळे पंचायतींचे महत्त्व कमी झाले आणि महिलांचा दर्जा अधिक मागासलेला झाला, त्यांना घराच्या चार भिंतीत बंदिस्त करण्यात आले. ब्रिटीश राजवटीत लॉर्ड रिपन यांनी १८८२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था बळकट करण्याचे प्रयत्न केले, तरीही महिलांचा सहभाग नगण्यच राहिला. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात खऱ्या अर्थाने बदलाला सुरुवात झाली. स्वातंत्र्यानंतर १९५७ च्या बळवंतराय मेहता समितीने लोकशाही विकेंद्रीकरणाची शिफारस केली. पुढे १९७४ च्या 'Status of Women in India' या समितीच्या अहवालाने राजकारणात महिलांच्या अत्यल्प सहभागावर चिंता व्यक्त केली.

स्वातंत्र्योत्तर काळ (१९४७-१९९२): पंचायत राजमध्ये महिलांना केवळ 'नामनिर्देशित' (Nominated) केले जात असे. त्यांना मतदानाचा अधिकार असला तरी निर्णय घेण्याची मुभा नव्हती.

७३ वी घटनादुरुस्ती (१९९२): हा भारतीय लोकशाहीतील एक क्रांतीकारी टप्पा ठरला.या दुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना संवैधानिक दर्जा मिळाला. कलम २४३ (घ) नुसार पंचायतींमध्ये महिलांसाठी आरक्षण अनिवार्य करण्यात आले. यामुळे

महिलांना केवळ मतदानाचा अधिकारच मिळाला नाही, तर धोरण ठरवण्याचे अधिकारही मिळाले. या दुरुस्तीने महिलांसाठी ३३% आरक्षण (महाराष्ट्रासारख्या राज्यात आता ५०%) अनिवार्य केले, ज्यामुळे ग्रामीण भारताच्या सत्तेची दारे महिलांसाठी खुली झाली.महाराष्ट्र, बिहार यांसारख्या अनेक राज्यांनी महिलांचे आरक्षण ५०% पर्यंत वाढवून त्यांना पुरुषांच्या बरोबरीने संधी दिली.मा.श्री.शरदचंद्र पवार यांनी महिला आरक्षणासाठी प्रयत्न करून महिलानां विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. महिलासाक्षामिकरणासाठी व पंचायत राज व्यवस्थेमध्ये महिला सहभाग वाढवण्यासाठी करण्यात आलेल्या घटनात्मक तरतुदी पुढील प्रमाणे-

**संवैधानिक आणि कायदेशीर तरतुदी**

७३ वी घटनादुरुस्ती: या दुरुस्तीमुळे पंचायत राज संस्थांमध्ये महिलांसाठी किमान एक तृतीयांश (१/३) जागा राखीव ठेवण्यात आल्या.

**महत्त्वाची कलमे**

कलम २४३ (घ): पंचायतींमध्ये महिलांसाठी आरक्षण.

कलम १५: लिंगाच्या आधारावर भेदभाव करण्यास मनाई.

कलम ३९: स्त्री-पुरुषांना समान कामासाठी समान वेतन आणि उपजीविकेचे समान अधिकार.

**महिला सहभागाच्या संधी आणि यश**

पंचायत राज व्यवस्थेमुळे महिलांना केवळ राजकीय पदच मिळाले नाही, तर त्यांच्या सामाजिक आणि वैयक्तिक आयुष्यात आमूलाग्र बदल झाले आहेत:

**निर्णय प्रक्रियेतील सक्रियता**

आरक्षणामुळे गावातील सामान्य घरातील महिला 'सरपंच' किंवा 'सदस्य' म्हणून निवडून येत आहेत. यामुळे धोरण आखताना आणि राबवताना महिलांच्या दृष्टिकोनाचा विचार होऊ लागला आहे.

**प्राधान्यक्रमात बदल**

महिला प्रतिनिधींच्या कामाचा अनुभव असे दर्शवतो की, त्या प्रामुख्याने पिण्याचे पाणी, स्वच्छता, अंगणवाड्या, प्राथमिक शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देतात. ज्याचा थेट फायदा ग्रामीण कुटुंबांना होतो.

**आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्व विकास**

ग्रामसभांचे नेतृत्व करणे, वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधणे आणि शासकीय कार्यालयांना भेटी देणे यामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढला आहे.

**सामाजिक प्रतिष्ठा**

राजकारणातील सहभागामुळे दलित आणि मागासवर्गीय महिलांना समाजात नवीन ओळख आणि मान-सन्मान प्राप्त झाला आहे, ज्यामुळे जुन्या सामाजिक उतरंडीला छेद मिळत आहे.

**विकासाचे प्राधान्यक्रम (Women's Priorities in Development)**

जेव्हा महिला सत्तेत येतात, तेव्हा विकासाचे मुद्दे बदलतात. महिलांनी खालील क्षेत्रांत विशेष योगदान दिले आहे:
पाणीपुरवठा आणि स्वच्छता: पिण्याच्या पाण्याचा प्रश्न महिलांशी थेट निगडित असल्याने त्यांनी याला प्राधान्य दिले.

शिक्षण आणि आरोग्य: प्राथमिक शाळा आणि आरोग्य केंद्रांच्या कारभारात महिला प्रतिनिधींमुळे सुधारणा झाली आहे.

व्यसनमुक्ती: अनेक गावांत महिलांनी पुढाकार घेऊन दारूबंदी आणि इतर सामाजिक सुधारणांचे ठराव संमत केले आहेत.

**महिला सहभागापुढील आव्हाने (Challenges)**

आज आपण जरी महिलांच्या सक्षमीकरणाबद्दल बोलत असलो तरी ही त्यांच्या मार्गात अनेक अडथळे आहेत ते पुढील प्रमाणे:

**सरपंच पती (Proxy Leadership) किंवा पुरुषप्रधान मानसिकता**

आजही समाजातील एक वर्ग महिलांच्या नेतृत्वाचा स्वीकार करण्यास तयार नाही.कागदोपत्री महिला सरपंच असते, पण प्रत्यक्ष कारभार तिचा पती किंवा घरातील पुरुष पाहतात. ही महिला सक्षमीकरणातील सर्वात मोठी बाधा आहे. महिला केवळ स्वाक्षरी करण्यापुरती मर्यादित राहते, ज्यामुळे आरक्षणाचा मूळ हेतू बाधित होतो.

**प्रशासकीय अज्ञान आणि निरक्षरता**

ग्रामीण भागातील अनेक महिला लोकप्रतिनिधींना सरकारी नियम, तांत्रिक बाबी आणि बजेट वाचण्यात अडचणी येतात. शिक्षणाअभावी त्या इतरांवर अवलंबून राहतात. अनेक महिला प्रतिनिधींना पंचायत राजमधील नियम, कायदे आणि बजेटिंगची तांत्रिक माहिती नसते. योग्य शिक्षणाच्या अभावामुळे त्या नोकरशाहीवर (उदा. ग्रामसेवक) अवलंबून राहतात.

**राजकीय गटबाजी आणि जातीयवाद**

ग्रामीण राजकारणातील वाढती गुन्हेगारी, जातीयवाद आणि पक्षांतर्गत गटबाजी यामुळे संयमी महिलांना काम करणे आव्हानात्मक ठरते.ग्रामीण राजकारणात असलेल्या या तीव्र गटबाजीमुळे आणि जातीय समीकरणामुळे महिलांना आपले स्वतंत्र नेतृत्व सिद्ध करणे कठीण जाते.

**आर्थिक परावलंबित्व**

आजही अनेक महिलांकडे स्वतःची स्वतंत्र मालमत्ता नसते. निवडणुकीचा खर्च आणि दैनंदिन राजकारणासाठी त्यांना पुरुषांवर आर्थिक अवलंबून राहावे लागते. आर्थिक तसेच पंचायत राज संस्थांना आर्थिक स्वातंत्र्याबाबत मर्यादा आहेत, ज्याचा परिणाम महिलांच्या विकासकामांवर होतो.

**कौटुंबिक आणि सामाजिक अडथळे**

घराची जबाबदारी, मुलांचे संगोपन आणि समाजाची 'स्त्रीने घराबाहेर पडू नये' ही मानसिकता यामुळे महिलांना राजकारणात पूर्ण वेळ देणे कठीण जाते.

**शिफारशी**

पंचायत राज व्यवस्थेमध्ये महिला सहभाग वाढावा यासाठी काही उपाययोजनापुढील प्रमाणे

- कौशल्य विकास आणि प्रशिक्षण: महिला लोकप्रतिनिधींसाठी विशेष 'लीडरशिप ट्रेनिंग' आणि प्रशासकीय कामकाजाचे प्रशिक्षण आयोजित करावे.
- कायदेशीर साक्षरता: महिलांना त्यांच्या हक्कांची आणि कर्तव्यांची माहिती करून देण्यासाठी जनजागृती मोहिमा राबवणे.
- प्रशासकीय सहकार्य: ग्रामसेवक आणि विस्तार अधिकारी यांनी महिला प्रतिनिधींना तांत्रिक कामात प्रामाणिकपणे सहकार्य करावे.
- आर्थिक सक्षमीकरण: पंचायतींना स्वतःचे उत्पन्न वाढवण्यासाठी प्रोत्साहन देणे जेणेकरून महिला प्रतिनिधींना विकासकामांसाठी निधीची कमतरता भासणार नाही.

**निष्कर्ष**

शेवटी असे म्हणता येईल की, पंचायत राज व्यवस्थेने भारतीय महिलांना केवळ राजकीय आरक्षण दिले नाही, तर त्यांना सन्मानाने जगण्याची आणि निर्णय घेण्याची संधी दिली आहे. पती-राज' किंवा 'साक्षरतेचा अभाव' यांसारखे अडथळे असले, तरी ग्रामीण भारतातील महिला नेतृत्व आता प्रगल्भ होत आहे. तरी महिलांचा राजकीय सहभाग पुरेश्या प्रमाणात वाढलेले दिसत नाही .जेव्हा महिला राजकीय दृष्ट्या पूर्णपणे स्वतंत्र होतील, तेव्हाच ७३ व्या घटनादुरुस्तीचे आणि 'ग्रामस्वराज्याचे' स्वप्न पूर्ण होईल. महिलांचा सहभाग केवळ नावापुरता न राहता तो गुणात्मक होण्यासाठी महिलांना सातत्यपूर्ण कायदेशीर प्रशिक्षण देणे, ग्रामसभांमध्ये महिलांची उपस्थिती अनिवार्य करणे आणि 'सरपंच पती' या संकल्पनेला कायदेशीररीत्या आळा घालणे आवश्यक आहे.

**संदर्भ**

१. पाटील, वा.भा. (१९९९), 'पंचायती राज्य', विद्या प्रकाशन, नागपूर.

२. पाटील, व्ही.बी. (२००५), 'महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरीक स्थानिक स्वराज्य संस्था', के सागर पब्लिकेशन्स, पुणे.

३. बेहेरे, डॉ. सुमन (२००४), 'सामाजिक संशोधन पद्धती', विद्या प्रकाशन, नागपूर.

४. आसोपा, जयनारायण (१९७९), 'कल्चरल हेरिटेज जयपूर', राजस्थान हिस्ट्री कॉंग्रेस, जयपूर.

५. भार्गव, बी. एस. आणि भास्कर, एम. (१९९२), 'वुमन इन ग्रासरूट्स डेमोक्रसी', युनिव्हर्सिटी ऑफ केरला, नवी दिल्ली: ICSSR.

६. सेंटर फॉर वुमेन्स डेव्हलपमेंट स्टडीज (१९९९), 'फ्रॉम ऑप्रेशन टू असर्शन: ए स्टडी ऑफ पंचायत्स अँड वुमन', नवी दिल्ली: CWDS.